सासू सासरे होताना

आपल्या घरातलं लग्न ठरलं की सगळ्यांचीच धांदल उडते. मग साखरपुडा, खरेदी, लग्नाची तारीख ठरवणे, कार्यालय पसंतीच त्याच तारखेला मिळणे, निमंत्रण पत्रिका छापणे, दागिने खरेदी अशा अनेक गोष्टी ------- घरातली सगळी माणसे त्याच गडबडीत असतात.

पण खरं तर सासू सासरे होत असताना केवळ या गोष्टींची तयारी केली म्हणजे आपण सासू सासरे होण्यासाठी सज्ज झालो असं नाही तर त्यासाठीची मानसिक तयारी कारणे हे आता काळाच्या ओघात महत्वाचे ठरत आहे. आपल्या घरात नवीन येणाऱ्या मुलीला माझ्या अगदी मुलीसारखी आहे हो असं म्हणण्यात काहीच अर्थ नसतो, कारण ती मुली ' सारखी ' असते, मुलगी नसते याचं भान कधी कधी सुटलेल दिसत. तिला खुबी खुबीन आपल्या घरात समाविष्ट करून घेण्याची गरज असते. आणि त्यासाठी आपल्या सवयी ,आपल्या पद्धती बदलाव्या लागतात. काही वर्षांपूर्वी जी काही तडजोड करायची ती सुनेने असे गृहीतक होते, पण आताच्या सुना सर्व बाबतीत अशा तडजोड करणाऱ्या नाहीत , त्यांचे प्राधान्यक्रम वेगळे आहेत, याचे भान सासू आणि सासरे दोघानीही ठेवणे गरजेचे आहे. बढती मिळते तेव्हा वाढणाऱ्या पगाराबरोबरच जबाबदाऱ्याही वाढतात. अगदी तसच आहे इथे. सासू सासरे हा हुद्दा जेव्हा मिळतो तेव्हा

अधिक प्रगल्भतेने वागावे अशी अपेक्षा असते. त्यामुळे काही गोष्टीं लक्षात ठेवणे, त्याचा अभ्यास करणे आवश्यक ठरते.

याबाबतीतला एक छान अनुभव इथे मुद्दाम सांगावासा वाटतो. एक दिवस सुलेखा ताई चा फोन आला. त्या म्हणाल्या यायचंय जरा गप्पा मारायला. म्हटलं काय विशेष? अहो राजन च लग्न ठरलय न! तर सासू होण्याची तयारी नको का करायला? माझ्या सासुबाई माझ्याशी जशा वागल्या तसं वागून चालेल का मला? आत्ताच्या मुली वेगळ्या आहेत. स्वतःची मते असलेल्या आहेत. त्यांची जीवन शैली पण निराळी आहे. करिअर ला प्राधान्य देणाऱ्या आहेत. किती किती गोष्टींची माहिती असते त्यांना? " अशा पद्धतीनं आपणहून येणारे पालक तर विरळाच.

मध्यंतरी एके ठिकाणी परिसंवादात बोलायला जायचा योग आला. माझ्याबरोबर असलेल्या एका संवादकाने एक निरीक्षण नोंदवले होते की जशी पानपट्टीची दुकाने कोपऱ्या कोपऱ्यावर असतात,

त्याप्रमाणे समुपदेशनाची केंद्रे ठिकठिकाणी असायला हवीत. इतकी समुपदेशनाची गरज आज कधी नव्हे इतकी भासते आहे.

सासू सासरे होण्याची तयारी आपली मुले वयात आल्यापासूनच सुरु करायला हवी असे वाटते मला.

मुले जशी वयात येतात, तेव्हापासून त्यांची क्षितिजे विस्तारत जातात. त्यांच्या धारणा बदलतात. अनेक आई वडिलांना असं वाटतं की आम्ही आमच्या मुलाला/ मुलीला चांगलं ओळखतो. काही जणांच्या बाबतीत ते खरं असेलही पण सगळ्यांनीच असा दावा करू नये असं वाटत मला. अनेक वेळा असं दिसत की हल्ली मुले / मुली काही गोष्टी आई वडिलांना सांगतात, विचारत नाहीत.

अशा वेळी आपल्या मुलाचा कल काय हे विचारात घ्यावं लागतं. त्यांना त्यांच्या पद्धतीनं जगून देणं

हे त्यातल्या त्यात सोपं आणि मनस्ताप न देणारं असू शकत.

आनंद वय २५, त्याचं लग्न अजून व्हायचंय. चांगलं शिकलेला, चांगल्या कंपनीत नोकरी करणारा .गेल्याच महिन्यात त्यानं सांगितलं घरात, की पुढल्या आठवड्यात उत्तराखन्डला चाललोय मदतकार्याला पंधरा दिवस. त्याची आई धास्तावली. कुठेतरी मनातून त्याचा अभिमानही वाटत होता, पण मनातली काळजी काही पाठ सोडत नव्हती. जून महिन्यातले उत्तराखंडचे वर्तमानपत्रातले

भीषण फोटो तिच्या नजरेसमोरून तरळून गेले. पण अशा वेळी विरोध करून चालत नाही. कारण हे मदतकार्य करण्यामागची त्यांची भूमिका काय आहे ते समजून घ्यायला हवे हे त्याच्या आईला चांगलंच माहित होतं. त्यामुळे त्याला त्याच्या पद्धतीनं काम करून देणं यातच शहाणपणा आहे, हे त्या चांगलंच जाणून होत्या.

अशी आई जेव्हा सासू होईल तेव्हा तिला सुनेशी मैत्री करणं नक्की सोपं जाईल, कारण समोरच्या व्यक्तीचा आदर करणं तिला छान जमतंय.

हे ज्या आईवडिलांना कळलं त्यांचं आपल्या मुलांशी /मुलींशी छान नाते जुळते. आणि ज्या आई वडिलांच आपल्या मुला/ मुलीशी परस्पर आदराच नातं आहे, त्या घरात एकूणच छान सूर जुळलेले दिसून येतात.

परंपरेच्या चौकटीतून बाहेर पडल्याखेरीज सासू सून जावई सासरे यांचे सूर जुळणं तसं अवघडच.

आपल्या घरात येणारी सून ही दुसऱ्या घरातून येणार आहे, वेगळ्या वातावरणात वाढलेली असणार,

तिच्या घरातली संस्कृती वेगळी असणार, तिच्यावरचे संस्कार निराळे असणार, हे लक्षात घ्यायला हवे.

स्वतःच्या कल्पनांना ,विचारधारेला मुरड घालायला हवी. सारासार विचार करायला हवा.

मनाचे दरवाजे खुले ठेवायला हवेत.

निधी – लग्न होऊन सहा महिने झाले होते. तिच्या माहेरी वातावरण सुधारलेले. त्यामानाने सासरी

थोडे विचार जुन्या पद्धतीचे. निधी आणि तिचा नवरा निशिकांत दोघेही उच्चशिक्षित.

पहिल्याच महिन्यात तिच्या सासू बाईंनी सांगितले की मासिक पाळीच्या वेळी चार दिवस बाजूला बसायला हवे. निधीला ब्रम्हांड आठवले. तिच्या घरात असे वातावरण नव्हते. तिला त्यावेळी कसे वागायचे ते माहीतच नव्हते. तरीही तिनं जमवून घ्यायचे ठरवले. पण ती बाथरूम मधून बाहेर आली की तिच्या सासुबाई चार चार बदल्या पाणी ओतत असत. त्यांच्या गावात पाण्याचं दुर्भिक्ष्य ! तिनं हे सांगून पाहील की असं पाणी ओतून देणं चांगलं नाही. आणि मी जास्तीत जास्त स्वच्छता पाळते.

पण त्यांनी ते ऐकल नाही, या ठिकाणी मात्र निधीला जमवून घेणं अशक्य होत. पाणी वाया घालवणं तिच्या विचारधारेत कुठेच बसत नव्हतं.

अनेकदा असे दिसते की आपल्या घरातली मुलगी जसे वागते तशीच सून वागली तर मात्र चालत नाही. दोघींशी वागताना फरक केला जातो. आपल्या मुलीने कसेही कपडे घातले तरी चालतात पण सुनेने मात्र शालीनच दिसले पाहिजे अशा अपेक्षा दिसतात. दर रविवारी किंवा सुट्टीच्या दिवशी मुलगी आपल्या मित्र मैत्रिणींमध्ये रमली तरी चालेल

पण सुनेने मात्र घरात राहून घरातली कामे केली पाहिजेत असे दृश्य दिसते. हे दुटप्पी धोरण नाते बिघडवण्यास कारणीभूत ठरते.

आता आपल्या मुलाचे लग्न होणार ,घरात कुणी नवीन माणूस आता कायमचा राहायला येणार,

याचीही मानसिक तयारी करावी लागते. आपल्या सवयी बदलाव्या लागतात. निर्णय घेताना नवीन आलेल्या व्यक्तीला सामावून घ्यायला हवे. कधी कधी सुरुवातीला हे लक्षात येत नाही. सुजाताच्या घरी श्रावणातली सत्यनारायणाची पूजा करायची होती. तिने दिवस ठरवला आणि तिच्या सुनेला – प्राचीला तिने सांगितले. त्या दिवशी रजा घ्यायला हवी हेही सांगितले. प्राची वैतागलीच. म्हणाली ,"आधी का नाही विचारलं ? मला ऑफिस मध्ये विचारायला पाहिजे."

सुजाता म्हणाली की ,"अग त्यात काय विचारायच आहे. नेहमी मीच ठरवते आणि सांगते. पूजा तर व्हायलाच हवी. एक दिवस काढता यायला हवा. परवा नाही अचानक रजा घेऊन तुम्ही दोघं लोणावळ्याला गेला होतात ? तेव्हा कशी रजा मिळाली ?"

अशी तुलना तर कधीच करू नये, कारण सत्यनारायणाची पूजा आणि दोघांनी मिळून एखादी सुट्टी एकत्र घालवणं यातला प्राधान्यक्रम प्रत्येकाचा वेगळा असू शकतो, नव्हे असतोच. तो जाणून घेण्याच्या क्षमता वाढवायला हव्यात.

नवीन सून घरी आली की सासऱ्यांना देखील स्वतःच्या सवयी बदलायला लागतात. ओंकारचे लग्न झाल्यावर प्रथमच काही महिन्यांनी त्याचे आईबाबा त्याच्या कडे राहायला आले होते. ओंकार नोकरी निमित्ताने दुसऱ्या शहरात राहायचा. पहिल्याच दिवशी ओंकारने बाबांच्या हातात एक टी शर्ट आणि

Track pant ठेवली आणि म्हणाला बाबा आता घरात गन्जीफ्रोक वर नाही राहायच. आणि बर्मुडा पण नाही घालायची. त्याचे बाबा खुल्या मानाने हसले . त्यांना जाणवले अरे आता नवीन माणूस आलंय न घरात? बदलायला हवं............................

उत्तरार्ध पुढील लेखात......